**Maharashtra State Board of**
**Secondary & Higher Secondary Education, Pune**
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

**महाराष्ट्र राज्य**
**माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे**
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Fax : 25665807 | Secretary(P) : 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-३/३८५४
दि.-१९/०७/२०१८ 20

प्रति,
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे

विषयः-माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी आरोग्य व शारीरिक शिक्षण, स्व-विकास व कलारसास्वाद, संरक्षणशास्त्र/स्काउट-गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. या विषयांच्या मान्यतेबाबत.

संदर्भः- १. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) यांचे जा.क्र.मराशैसंप्रप/ अविवि/ इ.१०वी विषय योजना व मूल्यमापन/२०१८-१९/२७३३ दि.१४/०६/२०१८
२. या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-३/३७२१ दिनांक १३/०७/२०१८
३. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ यांचे जा.क्र.२१४/ २०१८-१९ दिनांक १६/०७/२०१८ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, आरोग्य व शारीरिक शिक्षण, स्व-विकास व कलारसास्वाद, संरक्षणशास्त्र/स्काउट-गाईड/नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. या विषयांस प्रचलित पध्दतीनुसारच मान्यता देण्यात यावी किंवा कसे? याबाबत उपरोक्त विषयांना मंडळाची विषय मान्यता देण्यासंदर्भात आपणांस संदर्भीय पत्र क्र.२ नुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

१. आरोग्य व शारीरिक शिक्षण तसेच स्व-विकास व कलारसास्वाद हे दोन श्रेणी विषय अनिवार्य असल्यामुळे सदर विषयांना मंडळाची स्वतंत्र विषय मान्यता देण्याची आवश्यकता नाही वा त्यासाठी शुल्क आकारण्यात येऊ नये.
२. श्रेणी विषयात वैकल्पिक विषय म्हणून संरक्षणशास्त्र/ स्काउट गाईड/ नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा/एन.सी.सी. या वैकल्पिक विषयांपैकी यापूर्वी मान्यता नसलेले विषय शाळा सन २०१८-१९ या वर्षात वा त्यापुढे नव्याने चालू करणार असतील तर त्यांच्या मागणीनुसार प्रचलित पध्दतीप्रमाणे मंडळाची विषय मान्यता देण्यात यावी व त्यासाठी विहीत शुल्क आकारण्यात यावे.

परंतु संरक्षणशास्त्र विषयाच्या विषय मान्यता व शुल्काबाबत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ यांनी पुढील बाबी विचारार्थ मंडळास सादर केलेल्या आहेत.

१. यापूर्वी समाजसेवा गटातील समाजसेवा हा विषय सार्वत्रिक होता व अन्य पर्याय एन.सी.सी./स्काउट-गाईड/आर.एस.पी. हे निवडल्यास मान्यता घेतली जात असे.
२. दिनांक १४ जून २०१८ च्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या परिपत्रकातील मुद्या क्र.फ (पान क्र.३) नुसार शालेय प्रमाणपत्र विषयात संरक्षणशास्त्र हा विषय असेल व त्याला अन्य पर्याय दिले आहेत त्यामुळे सदर विषय शासनाने मोठया गटासाठी थेट लागू केला असल्याने त्याला पुन्हा मान्यतेची आवश्यकता नाही असे महामंडळाचे मत आहे.